# नि वे द न

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, ' विसाव्या शतकातील औंध संस्थानचा इतिहास ' हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरुण भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्. फिल्. पदवीसाठी विद्यापीठास सादर केला आहे. हा प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवी किंवा पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

(बापूराव उमाजी तुपे)
अभ्यासक

कोल्हापूर
दिनांक :

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## प्रमाणपत्र

श्री. बापुराव उमाजी तुमे यांनी इतिहास विषयातील एम्.फिल्. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाचा "विसाव्या शतकातील औंध संस्थानचा इतिहास" हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. तुमे यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारीत आहे.

(डॉ. अरुण भोसले)
प्रपाठक,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर
मार्गदर्शक

कोल्हापूर
दिनांक : २७ नोव्हेंबर १९९०.

# प्र स्ता व ना

ब्रिटिश अंमलात हिंदुस्थानचे ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थाने असे विभाजन झाले होते. संस्थानिक हे जरी तत्वत: स्वतंत्र असले तरी ते ब्रिटिश अधिसत्तेचे मांडलिकच होते. विसाव्या शतकामध्ये हिंदुस्थानात अनेक लहान मोठी संस्थाने होती. महाराष्ट्रात कोल्हापूर, फलटण, सावंतवाडी, जत, अक्कलकोट, भोर, जमखंडी, कुरुंदवाड, सांगली, मिरज, बुधगांव, वाडी जहागिर, औंध इत्यादी १८ संस्थाने होती. ही सर्व संस्थाने ब्रिटिश सत्तेची मांडलिक होती. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे, परकीय आक्रमणापासून संरक्षण इत्यादी सर्व बाबतीत ब्रिटिश अधिसत्तेने संस्थाने व संस्थानिक यांची पूर्ण हमी घेतलेली होती. लष्करी बाबतीत हे संस्थानिक ब्रिटिश अधिसत्तेवरच पूर्णपणे अवलंबून होते. त्यामुळे अंतर्गत बंडाळी परकीय आक्रमण या बाबतीत या संस्थानिकांना कसल्याच प्रकारची भीती राहिली नव्हती. त्यामुळे बहुतेक संस्थानाधिपती चैनी, विलासी बनले होते. अंतर्गत राज्यकारभार, प्रशासन व्यवस्था, संस्थानी प्रजेचे हित या बाबींकडे संस्थानिकांनी पूर्ण दुर्लक्ष केले होते. काही संस्थानात तर प्रशासन नावालासुध्दा उरलेले नव्हते. याचा अर्थ सर्वच संस्थानांची स्थिती अशी होती असे नाही. काही संस्थानांनी मात्र ब्रिटिश सत्तेच्या नियंत्रणाखाली राहून सुध्दा आपल्या अधिकारात शक्य तेवढी प्रगती करून घेतली होती. काहींनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढयात महत्वपूर्ण कामगिरी बजावली, याकडे आपणास दुर्लक्ष करता येत नाही. अशा संस्थानांचा स्वतंत्र अभ्यास करणे आवश्यक ठरते. दक्षिण महाराष्ट्रातील औंध हे छोटेखानी संस्थान विसाव्या शतकात त्याने केलेल्या प्रशंसनीय प्रगतीमुळे, विशेषत: ग्रामराज्याच्या प्रयोगामुळे, देशभर प्रसिध्दी पावले होते. मात्र औंध संस्थानचा विसाव्या शतकातील समग्र इतिहास ग्रंथरूपाने जिज्ञासूंना अद्याप उपलब्ध झालेला नाही.

मी माझ्या एम्.फिल्. पदवी परीक्षेच्या प्रबंधासाठी " विसाव्या शतकातील औंध संस्थानचा इतिहास " हा विषय निवडण्या पाठीमागील प्रेरणा " ग्रंथ हेच गुरू " या सुविचाराची सत्यता पटवून देणारी आहे. बॅरिस्टर

आप्पासाहेब पंत यांनी आपल्या प्रभावी लेखणीने ' मुलखा वेगळा राजा ' या कादंबरीवजा ग्रंथात आपल्या वडिलांचे चरित्र व एकप्रकारे विसाव्या शतकातील औंध संस्थानचा इतिहासच रेखाटला आहे. या ग्रंथास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई आणि मानसन्मान प्रकाशन, पुणे या संस्थेकडून दहावा मानसन्मान मिळालेला आहे. मी एम्.ए. चा अभ्यास करत असतानाच हा ग्रंथ माझ्या वाचनात आला. या मुलखा वेगळ्या राजाचे औंध संस्थान होते तरी कसे ? औंध संस्थानचा पूर्वेतिहास काय आहे ? या संस्थानातील प्रशासन व्यवस्था कशी होती ? या संस्थानची आर्थिक परिस्थिती कशी होती ? विसाव्या शतकामध्ये या छोटयाशा औंध संस्थानात कोणते घटनात्मक बदल घडून आले की ज्यामुळे संबंध भारतखंडाचे लक्ष या संस्थानाकडे लागून राहिलेले होते ? म. गांधींच्या विचारात अंतर्भूत असलेले ग्रामराज्य संस्थानात यशस्वी राबविण्याच्या केलेल्या प्रयत्नामागे कोणती प्रेरणाशक्ती कार्यरत होती ? या संस्थानने विसाव्या शतकात विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे रहस्य कोणते ? इत्यादी अनेक प्रश्नांची ऐतिहासिक दृष्टिकोनातून उत्तरे शोधण्याची मला उत्सुकता लागून राहिली.

औंध संस्थानचा इतिहास लिहिण्याबद्दल मला प्रभावीत करणारी दुसरी गोष्ट म्हणजे माझ्या कुकुडवाड (ता. माण, जि.सातारा) या गावाशेजारची झरे, जांभुळणी, विभूतवाडी इत्यादी गावे इ.स. १९४८ पर्यन्त म्हणजे संस्थानाच्या विलिनीकरणापर्यन्त औंध संस्थानात होती. झरे, जांभुळणी, विभूतवाडी या गावांच्या अगदी शेजारील माझे गाव मात्र खालसात होते. हे कसे काय ? हे जाणून घेण्याची मला जिज्ञासा वाटू लागली. त्यामुळे मी औंध संस्थानचा इतिहासाच्या अभ्यासाकडे वळालो. मनात वरचेवर येणा-या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रस्तुत प्रबंधात मी प्रयत्न केला आहे.

औंध संस्थानच्या विसाव्या शतकातील इतिहासाच्या काही प्रमुख अंगावर प्रकाश टाकणारे काही ग्रंथ आजपर्यन्त तयार झाले आहेत. औंध संस्थानच्या पूर्वेतिहासासंबंधी माहिती पुरविणारी अनेक साधने आज उपलब्ध

आहेत. सुप्रसिध्द इतिहासकार रा.ब. दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी औंधच्या प्रतिनिधी घराण्याचे संस्थापक परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचे छोटेसानी परंतु अत्यंत मौलीक चरित्र लिहिले आहे. श्री.वा.प. मेहेंदळे यांनीही `प्रतिनिधी घराण्याचा इतिहास - परशुराम त्र्यंबक प्रतिनिधींचे चरित्र ` हा ग्रंथ लिहिला आहे. औंध संस्थानचे विसाव्या शतकातील सुप्रसिध्द अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या प्रेरणेने व सहाय्याने श्री.अ.ना. भागवत यांनी `सातारा प्रतिनिधी घराण्याचा समग्र इतिहास ` या नावाने औंध संस्थानचा विस्तृत इतिहास दोन खंडात लिहिला आहे. या दोन खंडापैकी एक परशुराम त्र्यंबक व दुसरा त्यांच्या वंशजावर आहे. त्यानंतर अनेक संशोधकांनी त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु विसाव्या शतकामध्ये या औंध संस्थानची परिस्थिती कशी होती ? औंध संस्थानने कोणकोणत्या क्षेत्रात प्रगती केली होती ? यावर सविस्तर प्रकाश टाकण्याचा किंवा या कालखंडातील समग्र इतिहास लिहिण्याचा कोणीही प्रयत्न केलेला दिसून येत नाही. प्रस्तुत विषयावर इंदिरा रोदरमुंड या मूळची कारवारी असणाऱ्या विदुषीने अमेरिकन विश्वविद्यालया करता छोटेसानी पुस्तक लिहिले आहे. परंतु ते औंधच्या घटनात्मक प्रयोगाचा अभ्यास करून त्यावरील गांधीवादाचा प्रभाव विषद करते. औंध संस्थानच्या तत्कालीन इतिहासाशी संबंधित इतर गोष्टींचा या ग्रंथात अगदीच संक्षिप्त ऊहापोह केलेला आढळतो. विसाव्या शतकातील औंध संस्थानाधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे चिरंजीव बॅरिस्टर आप्पासाहेब पंत यांनी `मुलखा वेगळा राजा ` या आपल्या ग्रंथात कथा स्वरूपात औंध संस्थानचा इतिहास रेखाटला आहे. या ग्रंथास आपण इतिहास म्हणू शकत नाही. स्वत: लेखकानेही ते मान्य केलेले आहे. या ग्रंथाच्या सुरूवातीसच आप्पासाहेबांनी स्पष्ट केले आहे की, हा ग्रंथ गोष्ट आहे, इतिहास नाही, परंतु सत्य आहे. या ग्रंथावरून औंध संस्थानच्या तत्कालीन अधिपतींच्या व्यक्तिमत्वाचे अनेकविध पैलू, स्वराज्य राज्यघटनेचा संक्षिप्त

वृत्तांत, स्वातंत्र्य लढ्यातील औंध संस्थानचा सहभाग इत्यादी गोष्टींचे चांगले आकलन होते. तथापि तत्कालीन औंध संस्थानच्या प्रशासन, समाजजीवन, आर्थिक परिस्थिती या राज्यकारभार विषयक महत्वाच्या अंगांची ओळख करून देण्यास या ग्रंथाचा फारसा उपयोग होत नाही. तत्कालीन औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या रौप्य ज्युबिली महोत्सवानिमित्त इ.स. १९३४ व १९३५ असे दोन ग्रंथ, ` गौरव ग्रंथ मंडळ,` औंध यांनी अनुक्रमे चार व सहा विभागात प्रकाशित केले आहेत. यापैकी पहिला गौरव ग्रंथ बाळासाहेब पंतप्रतिनिधींना अनेक संस्था व व्यक्ती यांनी दिलेली मानपत्रे, केलेला गुण गौरव, बाळासाहेबांच्या विविध गुणांचा घेतलेला परामर्श या स्वरूपात आहे. दुसऱ्या गौरव ग्रंथात मात्र औंध संस्थानच्या पूर्वेतिहासापासून १९३५ पर्यंतचा औंध संस्थानचा इतिहास समाविष्ट केला आहे. या ग्रंथात संस्थानच्या मुलकी, न्याय, पोलीस या प्रशासकीय अंगांचीही माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थानातील शेती, उद्योगधंदे, इतर व्यवसाय या क्षेत्रातील आर्थिक प्रगतीचीही स्थूल माहिती दिलेली आहे. परंतु असे असले तरी या ग्रंथाचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्व कमी जाणवते. कारण शेवटी हा गौरव ग्रंथच आहे. श्री. वि.अ. पटवर्धन यांनी ` संस्थानातील लोकशाहीचा लढा ` या आपल्या ग्रंथात औंध संस्थानात घडून आलेल्या घटनात्मक प्रगतीवर प्रकाश टाकला आहे. तथापि हे विवेचन सन १९४० पर्यन्तच्या घडामोडींची उकल करते. संस्थानच्या घडामोडींची विलीनीकरणापर्यन्तच्या राजकीय व घटनात्मक घडामोडींची साधत माहिती देणारा कोणताही ग्रंथ उपलब्ध नाही.

माझ्या अभ्यास विषयाशी संबंधित असे प्रकाशित ग्रंथ, औंध येथील दप्तरखान्यात उपलब्ध असणारी संस्थानची वार्षिक प्रशासन अहवाल, राजपत्रे, चौकशी समित्यांचे अहवाल इत्यादी – महत्वाची प्रकाशित व अप्रकाशित

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कागदपत्रे यांच्या आधारे प्रस्तुत प्रबंध मी तयार केला आहे. ' विसाव्या शतकातील औंध संस्थानचा इतिहास ' या प्रबंधाची विभागणी पाच प्रमुख प्रकरणात केली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये औंध संस्थानच्या परशुराम त्रिंबकांपासून ते बाळासाहेबांच्या राज्यप्राप्तीपर्यन्तच्या पूर्वेतिहासाचा आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे संस्थानच्या भौगोलिक परिस्थितीचेही विवेचन या प्रकरणात केले आहे. दुसऱ्या प्रकरणात औंध संस्थानचे विसाव्या शतकातील राज्यकर्ते, त्यांची व्यक्तिमत्वे, धोरणे यांची चर्चा केली आहे. औंधचे विख्यात अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना राजपद कसे मिळाले ? त्याबद्दल लोकांची प्रतिक्रिया काय होती ? त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू यांचाही परामर्श याच प्रकरणात घेतला आहे. तिसऱ्या प्रकरणात विसाव्या शतकातील संस्थानचे प्रशासन - मुलकी प्रशासन, न्यायप्रशासन, पोलीस प्रशासन - या संबंधीची सविस्तर चर्चा केलेली आहे. चौथ्या प्रकरणात विसाव्या शतकात औंध संस्थानात घडून आलेल्या घटनात्मक प्रगतीचा विस्तृत आढावा घेतला आहे. या प्रकरणात औंध संस्थानातील ग्रामराज्याच्या प्रयोगाची विस्तृत माहिती दिलेली आहे. पाचव्या प्रकरणात संस्थानातील शेती, उद्योगधंदे इतर व्यवसाय यांचा संस्थानातील आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने आढावा घेतला आहे. शेवटी समारोप या प्रकरणात या अभ्यासाच्या प्रमुख निष्कर्षांची मांडणी केली आहे.

माझ्या प्रस्तुत संशोधनास अभ्यासक व वाचक यांच्याकडून योग्य दाद मिळेल असा भरवसा वाटतो.

बापूराव तुपे

कोल्हापूर

दिनांक :

# ऋ ण नि र्दे श

एम्. फिल्. पदवीसाठी तयार केलेल्या या शोधप्रबंधाचे काम पूर्ण होण्यासाठी अनेक संस्था व व्यक्ती यांचे मला मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. तसेच अनेकांची या कामी मला प्रत्याप्रत्यक्ष मदत मिळाली. त्या सर्वांचा ऋणनिर्देश करणे ही केवळ औपचारिकता नसून ते माझे आद्य कर्तव्य आहे असे मी समजतो. कारण त्या मदत सहकार्याशिवाय मी माझा हा अभ्यास पूर्ण करू शकलो नसतो.

प्रस्तुत अभ्यासासाठी इचलकरंजी येथील माझ्या देश.बा.मा. खंजिरे नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड कॉमर्स या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.के. पाटील यानी मला जे मौलिक मार्गदर्शन व सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या कॉलेजमधील माझे सहकारी प्रा. एस्.एस्. शिंदे, प्रा.बी.आर. गायकवाड, प्रा. बी.एल्.पवार, प्रा. व्ही.जी. यादव, प्रा. देशमुख, प्रा.रणदिवे, प्रा.सौ. घोटणे इत्यादींनी मला हा अभ्यासक्रम पुरा करण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक प्रोत्साहन दिले त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझ्या विषयासंबंधी उपयुक्त संदर्भ साधने मला शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर, श्री. भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय औंध येथे उपलब्ध झाली. महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाच्या मा. संचालकांनी मला विनाविलंब औंध येथील ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथातील उतारे झेरॉक्स करून घेण्याची परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. वरील दोन्ही संस्थातील ग्रंथपाल, अधीक्षक व इतर सेवक वर्ग यांच्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

---

मी प्रस्तुत विषयाचा अभ्यास व या प्रबंधाचे लेखन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागातील माझे संशोधक मार्गदर्शक डॉ. अरुण भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली केले. त्यांनी मला वेळोवेळी केलेले अचूक मार्गदर्शन, बहुमोल सहकार्य व दिलेले प्रोत्साहन याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी असेन. तसेच या कामासाठी मला इतिहास विभाग प्रमुख डॉ.मा.रा. कांबळे, इतिहास विभागातील डॉ. व.शं. कदम, डॉ. बी.डी. खणे, डॉ. एम्.ए. लोहार, डॉ. एम्.पी.पाटील आणि विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. एस्.एम्. दहिवले यांचेही सहकार्य, प्रोत्साहन, मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

माझे आई-वडील, बहिण-भाऊ यांनी अनेक हाल अपेष्टा सोसून देखील मला आर्थिक मदत केली, आशिर्वाद दिला, प्रोत्साहन दिले हे उपकार न फिटण्यासारखे आहेत, ते कधीही माझ्या स्मृतीआड होणार नाही. आजन्म त्यांचा मी ऋणी आहे. माझे सहकारी प्रा. एस्.जी. जाधव, प्रा. आर.के. देशमुख, प्रा. भोसले, श्री. जे.के. कांबळे, श्री.बी.एस्. माळी, श्री. बी.एन्. शेलार, श्री. एम्.डी. तुपे, श्री. बी.डी. लोखंडे, श्री. व्ही.यू. पवार, श्री. टी.टी. ननवरे यांची मला माझ्या कामात बहुमोल मदत झाली याबद्दल त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

या प्रबंधाचे टंकलेखन श्री. कवडे यांनी अल्पावधीत करून दिले याबद्दल त्यांचेही आभार.

बापूराव तुपे

नोव्हेंबर, १९९०

कोल्हापूर

# अ नु क्र म णि का


प्रस्तावना


ऋणनिर्देश

औंध संस्थानचा नकाशा

| अनु. | प्रकरणाचे नाव | पृष्ठांक |
| --- | --- | --- |
| १) | औंध संस्थान : पूर्वेतिहास आणि भौगोलिक परिस्थिती | |
| २) | विसाव्या शतकातील औंधचे राज्यकर्ते | |
| ३) | प्रशासन | |
| ४) | घटनात्मक प्रगती | |
| ५) | आर्थिक प्रगती | |
| | समारोप | |
| | परिशिष्ट नं. १ | |
| | परिशिष्ट नं. २ | |
| | परिशिष्ट नं. ३ | |



Shrimant Bhawanrao Shriniwasrao alias Balasaheb Pant Pratinidhi B. A., Ruler of Aundh.


औंध संस्थान
तालुका ठिकाण
मैल
औंध संस्थान व त्या खालील तालुके
रस्ते, रेल्वे, नद्या.
उ
द
वाई
संगममाहुली
सातारा
रहिमतपूर
औंध
कृष्णानदी
पारगाव
कोटी
चोणरी
व्याहापूर
बेलवडे
सैदापूर
कऱ्हाड
पाडळी
कोडोली
दुधोरे
मनु
बोरगाव
सोनकीरे
बिचुद
पेठ
कलेस्कतरवाडी
तासगाव
विटे
कुळसंद
येरवळहोक
विभूतवाडी
माणनदी
लिंगविरे
वाडी
उंबरगाव
नागज
जत
डफळापूर
सांगली
मिरज
शिरोळे
इचलकरंजी
कोल्हापूर
कुरुंदवाड
कागल
चिकोडी
अथणी
कृष्णानदी
हवनूर
कळगी
घनगी
निकोटी
कोट्याळ
विजापूर
जमखंडी
हुंगरगी